**<u>अभियोग पक्षाचा साक्षीदार क्र.१ श्री. प्रभाकर नामदेव सरग यांचा उलटतपास शपथेवर सुरू आरोपी पक्ष क्र.१ ते ३ यांचे करीता विद्वान श्री. मंचेरीअल एस.एन, विधीज्ञ यांचे द्वारा –</u>**

**९.** मी माझ्या घरासमोर माती टाकत होतो तेवढ्यात त्या तिघांनी माझ्या डोक्यात विट फेकुन मारली, मी चक्कर येऊन खाली पडलो, गणेशने माझ्या छातीवर जोरजोरात विटा मारल्या, त्यामुळे माझ्या डाव्या हाताच्या खांद्याला फॅक्चर झाले हे मी माझ्या पुराव्यात सरतपासात सांगीतलेले आहे. यातील पोलीसांना जबाब देतांना हे सांगीतले किंवा नाही हे आठवत नाही. हे माझ्या पोलीसांसमोरील जबाबात अशा स्वरुपात नाही. हे म्हणने खरे नाही की, मी पोलीसांत पोलीस म्हणून नौकरी केलेली आहे व मला सर्व माहीती असतांनासुध्दा मी जाणुन बजुन खोटे बोलत आहे. हे मला सांगता येणार नाही की, मला मार पडल्यानंतर उजव्या बाजुला पडलो आणि माझ्या खांद्याला फॅक्चर झाले. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की, मी चक्कर येऊन पडलो त्यामुळे मला काय सांगता येत नाही. हे म्हणने खरे आहे की, एखादा माणूस उजव्या बाजुला पडल्यास त्याच्या डाव्या खांद्याला फॅक्चर होणार नाही. हे म्हणने खरे नाही की, मी पोलीसात काम केल्यामुळे जाणुनबुजुन पुर्ण माहीतीपुर्वक मी माझा जबाब बदलत आहे. हे म्हणने खरे आहे की, मी बेशुद्ध झाल्यानंतर त्यावेळी मी बोलण्याच्या मनस्तीतीत नव्हतो. हे म्हणने खरे नाही की, मी बेशुध्द असतांनासुध्दा आरोपी गणेशने मला वारंवार मारले हे मी खोटे सांगतो आहे. हे म्हणने खरे नाही की, गणेशने मला मारले हे मी दुस–याने सांगीतल्यानुसार सांगतो. हे मला माहीत नाही की, माझ्या वैद्यकिय अहवालात मी बेशुध्द असल्याचे कोठेही नमुद नाही. हे म्हणने खरे नाही की, मी कधीच बेशुध्द झालो नाही.

**१०.** हे मला सांगता येणार नाही की, मी पोलीस ठाण्यात लगेच का गेलो नाही. हे मला सांगता येणार नाही की, दिनांक ०१.११.२०२१ रोजी दुपारी साडे तीन वाजता माझ्या बद्दल पोलीसांना कळविण्यात आले. घाटी इस्पीतळात गेलो नाही याचे कारण गल्लीतल्या लोकांनी मला नजीकच्या इस्पीतळात नेले. हे म्हणने खरे नाही की, मी जाणुनबुजुन खाजगी इस्पीतळात दाखल झालो कारण मला पाहिजे तसे फिर्याद जबाब अथवा फिर्याद दाखल करता येईल. हे म्हणने खरे आहे की, मी दिनांक २९.१०.२०२१ पासून ते ३१.१०.२०२१ रोजीपर्यंत इस्पीतळात भरती होतो. हे म्हणने खरे आहे की, इस्पीतळात दाखल असतांना मी बाहेर कोठेच गेलो नाही असा मी जबाब दिलेला आहे.

**११.** आज रोजी माझे वय ८४ वर्षे चालु आहे. माझे घटनेच्या वेळी वय ७९ वर्षे होते. माझ्या एक्सरे मध्ये माझे वय ६५ वर्षे व वेगळाच आयडी लिहलेला आहे याबद्दल मला काहीच माहीती नाही. हे म्हणने खरे नाही की, दिनांक ०८.११.२०२१ रोजी घटनेच्या आठ दिवसानंतर मी एक्सरे काढलेला आहे. माझ्या दोन्ही एक्सरेमध्ये वेगवेगळे वय का लिहले याचे कारण मला काही

माहीत नाही. हे म्हणने खरे नाही की, मी जाणुनबुजून खोटे एक्सरे हजर केले. हे मला सांगता येणार नाही की, एम.एल.सी. अहवालात मला साडे तीन वाजता रुग्णालयात भरती केले असे लिहलेले आहे.

[साक्षीदाराने आज कानाला लावायचे मशीन आणलेले नाही, त्यामुळे साक्षीदाराला प्रत्येक बाब ही ओरडुन विचारावी लागत आहे. त्यामुळे साक्षीदाराला सांगण्यात आले की, पुढील तारेखेस येतांना कानाला लावायचे मशीन घेऊन यावे.]

**उर्वरीत उलटतपास पुढील तारखे पर्यंत तहकुब.**

| समक्ष | श्रवणोत्तर स्वीकृती. |
|---|---|
| **–/स्वाक्षरीत/–** | **–/स्वाक्षरीत/–** |
| ( श्री. आर. एस. जांबोटकर ) | ( श्री. आर. एस. जांबोटकर ) |
| मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद | मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद |

दिनांक– ०२/०८/२०२५